
| Name of the Activity | |
|---|---|
| **NIC Camp- State Level NSS Special Camp organized on the theme of 'Sudhrudh Bharat, Shresth Bharat' at Shri Kshetra Nagai Mata Mandir Kokle Ta. Sakri Dist. Dhule** | |
| Date of the activity | **24/02/2020-01/03/2020** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | Team Leaders-03<br>Program Officers-03<br>Supporting Staff-02 |
| No. of Students Participated | Boys-43<br>Girls-29<br>Total=72 |
| Collaborating Agency | Dept. of NSS KBC NMU, Jalgaon |
| Impact of the Activity | Volunteers are made aware about the importance of health and hygiene and its contribution in making of India |



|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

"A" Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो-/राविश्रशि /५८/२०२०

दि.२२/०२/२०२०

प्रति,
मा.प्राचार्य,
सि.गो.पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि.धुळे

**विषय** :- राज्यस्तरीय शिबीर आयोजनाबाबत...
**संदर्भ**:-आपले पत्र क्र .३६५/२०२० दि.०८/०२/२०२०

मा.राज्यसंपर्क व विशेष कार्यअधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग रासेयो कक्ष मुंबई यांनी पत्र क्र. रासेयो-२०२०/प्र.क्र-२८/साशि-७ दि.११/०२/२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजीत करण्यास परवानगी दिलेली आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दि.२४ फेब्रुवारी ते ०३ मार्च ,२०२० या कालावधीत **सदृढ युवक,श्रेष्ठ भारत** या संकल्पनेवर आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे.सदर शिबीर सात दिवसांकरीता घ्यावयाचे असून महाराष्ट्र राज्यातील रासेयोचे ५ मुली,५मुले व एक कार्यक्रम अधिकारी यांचा संघ सहभागी होणार आहे.उपस्थितांकरीता चहा,नास्ता,भोजन,निवास, प्रमाणपत्र,स्मृतीचिन्ह,फोटो,अहवाल,तज्ञ मार्गदर्शक इ.करीता विद्यापीठा कडूनअग्रीम देण्यात येईल.तरी आपण राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीर आयोजनाची जबाबदारी स्विकारुन यशस्वीपणे पार पाडावे हि नम्र विनंती. कळावे.

आपला विश्वासू,

(डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे)
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना.

**प्रत** :-
१. विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय
२. विभाग प्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय
३. विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय
४. विभाग प्रमुख, वित्त व लेखा कार्यालय

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई यांच्या सहमतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे, सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

# "राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर"

२४ फेब्रुवारी २०२० ते १ मार्च २०२०

## *उद्घाटन समारंभ*

सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ११:०० वाजता

## *समारोप समारंभ*

रविवार दि.०१ मार्च २०२० रोजी सायंकाळी ४:०० वाजता

स्थळ – श्रीक्षेत्र नागाई कोकले ता. साक्री जि. धुळे

बुक पोस्ट

प्रति,

मा. श्री ..............................

..............................

## *दिनचर्या*

| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|
| [illegible] | जागर | दु. ३.४५ ते ४.३० | व्याख्यानसत्र २४/६/८/७ |
| [illegible] | प्रार्थना, योगा, ध्यानधारणा, लद्दूड आसने (११) नागरिकांसहित | | |
| [illegible] | चहापान व अल्पोपहार | संध्या. ४.३५ ते ५.१५ | चहापान |
| [illegible] | श्रमदान | संध्या. ५.२० ते ७.०० | मैदानीखेळ व गटचर्चा |
| [illegible] | स्वयंस्वच्छता | संध्या. ७.१५ ते ८.०० | भोजन |
| [illegible] | भोजन व विश्रांती | रात्री ८.१५ ते ९.३० | सांस्कृतिक विचारमंथन |
| [illegible] | गीतमंच | रात्री ९.३५ ते ९.५० | प्रार्थना |
| [illegible] | व्याख्यानसत्र १/३/५/७/९ | रात्री ९.५५ | दिनसमापन |

## *प्रेषक*

प्राचार्य डॉ. आर.आर.अहिरे

डॉ. पी. एस. नन्नवरे संचालक रा.से.यो.

डॉ. वाल्मिक शंकर आढावे, जिल्हा समन्वयक

डॉ. सचिन जयराम नांद्रे, विभागीय समन्वयक

डॉ. लहु बाबुलाल पवार, विद्यार्थी विकास अधिकारी

प्रा. विश्वास बदन भामरे, शिबीर समन्वयक

डॉ. ज्ञानेश्वर शांताराम चव्हाण, शिबीर सह समन्वयक

डॉ. ज्योती महादेव वाघोदे, शिबीर महिला समन्वयक

प्रा. बी.पी.अहिरराव, शिबीर सह समन्वयक

# *प्रमुख कार्यक्रम*

शिबीरात खालील सन्माननीय व्याख्यात्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे

| दिनांक | वेळ | व्याख्यात्यांचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| २४/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | श्री. धनंजय सोनवणे | गड किल्ले संवर्धनात |
| | ३.४५ ते ४.३० | श्री. सागर साळुंके | युवकांचा सहभाग |
| २५/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | प्रा. एल.जी.सोनवणे | रा.से.यो. व युवक |
| | ३.४५ ते ४.३० | डॉ. जे.एन.चौबे | मानसिक आरोग्य |
| २६/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | प्रा. विलास चौव्हाण | नैतिक मूल्ये व आधुनिक जीवनशैली |
| | ३.४५ ते ४.३० | डॉ. वाल्मिक आढावे | मैत्री क्रिडांगणाशी |
| २७/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | श्री. सुहास सोनवणे | विज्ञाननिष्ठ युवक |
| | ३.४५ ते ४.३० | डॉ. माधव कदम | राष्ट्र निर्माणात युवकांची भुमिका |
| २८/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | डॉ. सचिन नांद्रे | यशस्वी जीवनाचा राजमंत्र |
| | ३.४५ ते ४.३० | डॉ. सुनिल पाटील | व्यसनमुक्त समाज |
| २९/०२/२०२० | ३.०० ते ३.४५ | डॉ. सुधाकर जाधव | नदीनिपजाली युवक |
| | ३.४५ ते ४.३० | डॉ. प्रकाश साळुंके | युवकः एक कलेचा उपासक |
| ०१/०३/२०२० | ९.०० ते ९.४५ | डॉ. डी. के. देसले | सोशल मिडीया व आजचा युवक |
| | ९.४५ ते १०.३० | डॉ. अनंत पाटील | युवक व कौटुंबिक भावनिकता |

## *गटचर्चा विषय*

*राष्ट्रीय एकात्मता*जातीय सलोखा*लोकशाही मूल्ये*डिजीटल क्रांती*
व्यसनाधिनता*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण*स्त्री-पुरुष समानता*

## *गटचर्चा मार्गदर्शक*

डॉ. डी. बी. बच्छाव   डॉ. एस. सी. सोनवणे   डॉ. एस. आर. गोसावी
डॉ. धनंजय पाटील   डॉ. जितन तोरवणे   डॉ. चंद्रकांत कढरे

## *गीतमंच*

डॉ. विजय बच्छाव   श्री. अविनाश मराठे   श्री. रविंद्र खैरनार

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई यांच्या सहमतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे, सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

## *उद्घाटन समारंभ*

सोमवार दि. २४/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता

अध्यक्ष - मा. प्रा. डॉ. आर.आर.अहिरे.

उद्घाटक- मा. प्रा. डॉ. एस.एस.सोनवणे.
(सिनेट सदस्य क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव)

## *प्रमुख अतिथी*

मा. डॉ. पंकजकुमार नन्नवरे.
(समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव)

मा. प्रा.एल.जी.सोनवणे.
(माजी. अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव)

मा. महंत १००८ भगवानगिरी महाराज. (महंत मठाधीपती नागाईमाता ट्रस्ट)

## *समारोप समारंभ*

रविवार दि. ०१/०३/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता

अध्यक्ष- मा. आबासाहेब सुरेश रामराव पाटील.
(सचिव विद्या विकास मंडळ, साक्री)

समारोप कर्ते – मा. प्राचार्य. डॉ. आर.आर.अहिरे

प्रमुख अतिथी - मा. डॉ. वाल्मिक आढावे. (जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना)

मा. उपप्राचार्य. डॉ. अनंत पाटील

मा. डॉ. सचिन नांद्रे (विभागीय समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना)

*आपले नम्र*

प्राचार्य डॉ. आर.आर.अहिरे

डॉ. पी. एस. नन्नवरे संचालक रा.से.यो.

डॉ. वाल्मिक शंकर आढावे, जिल्हा समन्वयक

डॉ. सचिन जयराम नांद्रे, विभागीय समन्वयक

डॉ. लहु बाबुलाल पवार, विद्यार्थी विकास अधिकारी

प्रा. विश्वास बदन भामरे, शिबीर समन्वयक

डॉ. ज्ञानेश्वर शांताराम चव्हाण, शिबीर सह समन्वयक

डॉ. ज्योती महादेव वाघोदे, शिबीर महिला समन्वयक

प्रा. बी.पी.अहिरराव, शिबीर सह समन्वयक

# अहवाल

## राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर (NIC CAMP )

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई राष्ट्रीय सेवा योजना कक्ष ,मुंबई, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. जळगाव आणि विद्या विकास मंडळाचे. सिताराम गोविंद पाटील कला. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय. साक्री जिल्हा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर

## दिनांक 24 फेब्रुवारी 2020 ते 1-3-2020

## स्थळ- श्री क्षेत्र नागाई माता मंदिर (ग्रामपंचायत कोकले) तालुका साक्री जिल्हा धुळे

दिनांक 24 फेब्रुवारी 2020 वार सोमवार

### उद्घाटन समारंभ

सदर शिबिराचे उद्घाटन दिनांक 24 फेब्रुवारी 2020 रोजी ठीक दहा वाजता व विद्या विकास मंडळाचे ,सिताराम गोविंद पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. राजेंद्र अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे अधिसभा सदस्य( सिनेट सदस्य) प्राध्यापक संजय सोनवणे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे हे होते तसेच दुसरे प्रमुख पाहुणे प्रा.एल.जी सोनवणे हे होते तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय समन्वयक डॉ.सचिन नांद्रे व श्रीक्षेत्र नागाई माता मंदिराचे माननीय महंत प्रणव गिरीजी महाराज व उपप्राचार्य डॉक्टर आनंत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच शिबिर समन्वयक प्रा. विश्वास भामरे शिबिर सहसमन्वयक डॉ.डी .एस. चव्हाण व शिबिर महिला समन्वयक डॉ. ज्योती बाकोडे तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ सुरेश सोनवणे त्याचप्रमाणे नांदेड विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक डॉक्टर साईनाथ उमाटे तसेच गोंडवाना विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक डॉक्टर विश्वनाथ दरेकार आणि कृषी विद्यापीठ राहुरी चे संघ व्यवस्थापक प्रा. संदीप सूर्यवंशी इत्यादी उपस्थित होते' सदर शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक डॉक्टर पंकज कुमार नन्नवरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर ज्योती बाकोडे यांनी केले आणि या कार्यक्रमाचे आभार प्रा.विश्वास भामरे यांनी मानले .

सदर शिबिरात खालील प्रमाणे दिनचर्या यानुसार व कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यक्रम पार पडले

दिनांक 24 फेब्रुवारी 2020 रोजी

उद्घाटन कार्यक्रम संपल्यानंतर दुपारच्या जेवणानंतर आलेल्या सर्व शिबिरार्थींचा परिचय व गट विभागणी करण्यात येऊन एकूण सात गट तयार करण्यात आले सायंकाळी मनोरंजनात्मक खेळ खेळण्यात आले व रात्रीचे भोजन व त्यानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यां मार्फत करण्यात आले व त्यानंतर दीप मालवण रात्रीच्या प्रार्थनेनंतर झाले.

दिनांक 25 फेब्रुवारी 2020 वार मंगळवार

रोजी पहाटे जागर, व्यायाम, योगा, मेडिटेशन, प्रार्थना नंतर चहा, नाश्ता त्यानंतर नागाई माता मंदिर परिसरात दिनांक 21 फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त झालेल्या यात्रेनिमित्त झालेली घाण व प्लास्टिक ची स्वच्छता करण्यात आली .त्यानंतर आंघोळ त्यानंतर दुपारचे भोजन त्यानंतर NSS गीत मंच आणि त्यानंतर दुपारच्या बौद्धिक चर्चासत्रात डॉ. विजय बच्छाव यांचे व्याख्यान झाले तदनंतर दुसरे बौद्धिक चर्चा सत्र प्रा.एल. जी. सोनवणे यांचे" राष्ट्रीय सेवा योजना व युवक" या विषयावर व्याख्यान झाले तर डॉ.जयप्रकाश चोबे यांचे "मानसिक आरोग्य" या विषयावर व्याख्यान झाले नंतर संध्याकाळी 'जातीय सलोखा' या विषयावर विद्यार्थ्यांची गटचर्चा झाली. सदर गट चर्चेत कु. गायत्री सोनवणे यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर द्वितीय क्रमांक कुमारी विशाखा साळी हिने मिळविला गट चर्चेचे परीक्षण डॉ. साईनाथ उमाटे व प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी केले त्यानंतर संध्याकाळी मनोरंजनात्मक

खेळ व त्यानंतर रात्रीचे भोजन आणि भोजनानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन झाले आणि रात्री प्रार्थनेनंतर दीप मालवण करण्यात आले

दिनांक 26 फेब्रुवारी 2020 वार बुधवार

रोजी पहाटे जागर व्यायाम योगा मेडिटेशन प्रार्थना त्यानंतर चहा नाश्ता नंतर नागाई माता मंदिर परिसरात श्रमदान व आंघोळी अंघोळीनंतर दुपारचे जेवण त्यानंतर प्राध्यापक विश्वास भामरे यांनी गीत मंच यात राष्ट्रीय सेवा योजना व जागर गीते विद्यार्थ्यांना शिकविले त्यानंतर बौद्धिक चर्चासत्रात डॉ. विलास चव्हाण यांचे "नैतिक मूल्य आणि आधुनिक जीवनशैली" व डॉ. वाल्मीक आढावे यांचे "मैत्री क्रीडांगणाशी" या विषयांवर व्याख्याने झाली. त्यानंतर सायंकाळी "स्त्री -पुरुष समानता" या विषयावर गटचर्चा झाली त्यात प्रथम क्रमांक सोनवणे अक्षय यास मिळाला तर द्वितीय क्रमांक जाधव विशाल यास मिळाला. गट चर्चेचे परीक्षण डॉक्टर साईनाथ डॉ. विश्वनाथ दरेकर व डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले संध्याकाळी खेळ व त्यानंतर रात्रीचे भोजन झाले त्यानंतर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्या कार्यक्रमांमध्ये सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे नियोजन शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी केले व सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले त्यानंतर रात्रीची प्रार्थना झाली आणि प्रार्थनेनंतर दीप मालवण करण्यात आली.

दिनांक 27 फेब्रुवारी 2020 वार गुरुवार

रोजी पहाटे जागर व्यायाम योगा प्राणायाम प्रार्थना व त्यानंतर सकाळचा चहा नाश्ता त्यानंतर कोकले या गावात स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले त्यात 'स्वच्छ भारत मिशन', 'तंबाखू मुक्त अभियान', 'बेटी बचाओ बेटी पढाओ", 'प्लास्टिक मुक्त भारत', 'सुदृढ युवक श्रेष्ठ भारत' या विषयांवर घोषणा व पथनाट्याचे आयोजन केले गेले व कोकले गावात जनजागृती करण्यात आली व त्याचबरोबर स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी संपूर्ण कोकले गावाची स्वच्छता करण्यात आली त्यानंतर शिबीर स्थळी येऊन आंघोळी केल्या गेल्या त्या नंतर भोजन त्यानंतर दुपारच्या बौद्धिक चर्चासत्रात श्री अविनाश मराठे यांनी गीत मंच यात प्रबोधनपर गीत गायन केले व त्यानंतर दुपारच्या बौद्धिक चर्चासत्रात डॉ. माधव कदम यांचे "राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका" व श्री सुहास सोनवणे यांचे "विज्ञाननिष्ठ युवक" या विषयावर व्याख्याने झाली. त्यानंतर दुपारचा चहा त्यानंतर "कौटुंबिक भावनिकता" याविषयावर विद्यार्थ्यांची शिबिरार्थी विद्यार्थ्यांची गट चर्चा झाली त्यात जाधव विशाल यास प्रथम पारितोषिक मिळाले तर थोरात मनीषा हीच द्वितीय क्रमांक मिळाला गटचर्चा चे परीक्षण डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण व डॉ.. ज्योती वाकोडे यांनी केले त्यानंतर संध्याकाळी मनोरंजनात्मक खेळ आणि गित मंच झाला त्यानंतर रात्रीचे भोजन व त्यानंतर रात्री प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन विद्यार्थ्यांनी केले व त्यानंतर रात्रीची प्रार्थना आणि दिपमालवण झाले.

दिनांक 28 फेब्रुवारी 2020 वार शुक्रवार

रोजी पहाटे जागर व्यायाम योगा मेडिटेशन प्रार्थना चहा-नाश्ता व कोकले.गावात श्रमदान करण्यात आले दुपारी अंघोळी नंतर भोजन त्यानंतर श्री रवींद्र खैरनार यांनी गीत मंच यामध्ये क्रांती गीते शिबिरार्थी विद्यार्थ्यांना शिकविले त्यानंतर बौद्धिक चर्चासत्रात डॉ.सचिन नांद्रे यांचे "यशस्वी जीवनाचा राजमंत्र" व प्रा. सुनील पाटील यांनी "व्यसनमुक्त समाज" या विषयावर व्याख्याने दिली त्यानंतर "ढासळती नीतिमूल्ये" या विषयावर विद्यार्थ्यांची गटचर्चा झाली त्यात भावसार ममता हीच प्रथम पारितोषिक मिळाले तर राजरत्न गवांदे यास द्वितीय क्रमांक मिळाला गटचर्चा चे परीक्षण डॉ. साईनाथ उमाटे व डॉ.ज्योती वाकोडे यांनी केले त्यानंतर सायंकाळचे मनोरंजनात्मक खेळ विद्यार्थ्यांचे झाले आणि रात्रीच्या भोजनानंतर सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनात्मक कार्यक्रम श्री विजय हिरे यांनी संमोहनाचे प्रयोग शिबिरार्थींना दाखविले आणि रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर प्रार्थना व दीप मालवण झाली

29 फेब्रुवारी 2020 वार शनिवार

रोजी पहाटे जागर व्यायाम योगा प्राणायाम मेडिटेशन प्रार्थना नंतर चहा नाश्ता त्यानंतर मंदिर परिसरात स्वच्छता व श्रमदान करण्यात आले त्यानंतर शिबिरात विद्यार्थ्यांच्या अंघोळीनंतर दुपारचे भोजन व त्यानंतर श्री अविनाश मराठे यांचे गितमंच झाले त्यात क्रांती गीते ,जागर गीते, देशभक्तीपर गीते शिबिरातील विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. त्यानंतर बौद्धिक

चर्चासत्रात डॉ.प्रकाश साळुंके यांचे "युवक: एक कलेचा उपासक" या विषयावर व्याख्यान झाले त्यानंतर दैनिक लोकमतचे पत्रकार श्री आबा सोनवणे यांचे "पत्रकारिता व युवकांची भूमिका" या विषयावर शिबिरार्थी विद्यार्थ्यांसोबत परिसंवादात्मक चर्चा झाली त्यात अनेक सामाजिक, सांस्कृतिक विषयांसंदर्भात शिबिरार्थी व श्री आबा सोनवणे यांच्यात मतमतांतरे झालीत व त्यानंतर "गड किल्ल्यांचे संवर्धन" या विषयावर गट चर्चा झाली त्यात नुहन शेख या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक मिळविला तर सुरवसे गीतांजलि हिला द्वितीय क्रमांक मिळाला गटचर्चा चे प्रश्न परीक्षण प्रा. विश्वास भामरे आणि डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले त्यानंतर रात्रीचे खेळ व रात्रीच्या भोजनानंतर सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम कार्यक्रमात प्रा. विश्वास भामरे यांचे व शिबिरार्थींना चे विचारमंथन झाले त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाले आणि त्यानंतर प्रार्थना व दीप मालवण झाले

दिनांक 1 मार्च 2020 वार रविवार

रोजी पहाटे जागर व्यायाम योगा प्राणायाम मेडिटेशन प्रार्थना त्यानंतर सकाळचा चहा नाश्ता त्यानंतर पांझरा नदीची सफारी व तीची भौगोलिक रचना व तिचे ऐतिहासिक महत्त्व व पांझरा नदीवरील फड सिस्टम चा इतिहास सुमारे तीनशे पन्नास वर्षांपूर्वीचा कसा आहे हे शिबिरार्थी विद्यार्थ्यांना शिबिर समन्वयक प्रा. विश्वास भांमरे यांनी समजावून सांगितले व महाराष्ट्रातील सगळ्यात उत्पादन क्षमतेने मोठा असणारा पाझरा -कान साखर कारखाना याविषयी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यानंतर डॉ. विजय देसले यांचे "सोशल मीडिया व आजचा युवक" या विषयावर व्याख्यान झाले तर डॉ. अनंत पाटील यांचे "युवक व कौटुंबिक भावनिकता" या विषयावर वैचारिक प्रबोधन झाले त्यानंतर दुपारच्या जेवणानंतर श्री. रवींद्र खैरनार यांचे गितमंच झाले त्यानंतर चहा व त्यानंतर शिबीराचा समारोप समारंभ दुपारी पार पडला

**समारोप समारंभ** दि. ०१ मार्च २०२०

दिनांक २४. फेब्रुवारी २०२० पासून सुरु झालेल्या सात दिवसाच्या शिबिराचा समारोप समारंभ दिनांक 1 मार्च 2020 रोजी दुपारी ठीक चार वाजता सुरु झाला समारोप करते डॉ. आनंत पाटील हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सी.गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे हे होते तसेच शिबिरात चार शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली त्यात नुहान शेख, राजरत्न गवांदे, हर्षाली गायकवाड, सिद्धेश्वर लांडे यांनी मनोगते व्यक्त केली तसेच संघ व्यवस्थापकांमधुन डॉ. साईनाथ उमाटे प्रा. सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले सदर शिबिराचा सात दिवसांचा कामकाजाचा तसेच दिनचर्या च्या कार्यक्रमाचा अहवाल शिबिर समन्वयक प्रा. विश्वास भामरे यांनी मांडला त्यानंतर समारोप करते डॉक्टर आनंत पाटील यांनी शिबिरार्थींना मोलाचे मार्गदर्शन केले व प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योती वाकोडे यांनी केले तर डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आभार मानले शिबिरात शिबिरार्थी विद्यार्थ्यांना व आलेल्या संघ व्यवस्थापकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले त्यासोबतच उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणुन राजरत्न गवांदे, साळी विशाखा, सुरवसे गीतांजली, निकम शितल, हर्षाली गायकवाड, लांडे सिद्धेश्वर, धनगर दीपक, सोनवणे अक्षय, बेंडईत विशाल, जाधव विशाल ,सोनवणे गायत्री व डॉक्टर साईनाथ उमाटे यांना उत्कृष्ट स्वयंसेवक व उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणुन प्रमाणपत्र देण्यात आले आणि सदर शिबिराचा समारोप झाला.

सदर शिबिराच्या यशस्वितेसाठी श्रीक्षेत्र नागाई माता ट्रस्ट चे मठाधिपती श्री महंत 1008 प्रणव गिरी जी महाराज व कासारे येथील ज्येष्ठ समाजसेवक श्री सुरेश भाऊ पारख यांनी व मंदिर परिसरातील सेवक श्री चंद्रकांत परदेशी व सिताराम गोविंद पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकेकाच्या विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी कुमारी तेजस्विनी बोरसे यांनी व स्वयंसेवकांनी तसेचप्राचार्य , डॉ. राजेंद्र अहिरे उपप्राचार्य डॉक्टर आनंत पाटील डॉक्टर पंकज कुमार नन्नवरे जिल्हा समन्वयक डॉक्टर वाल्मिक आढवे विभागीय समन्वयक डॉक्टर सचिन नांद्रे शिबिर समन्वयक प्राध्यापक विश्वास भामरे शिबिर सहसमन्वयक डॉक्टर ज्ञानेश्वर चव्हाण महिला समन्वयक डॉक्टर ज्योती वाकोडे प्राध्यापक भूषण अहिरराव व शिक्षकेतर कर्मचारी श्री शरद बोरसे व श्री अतुल ठाकरे यांनी व महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले सदर शिबिरात एकूण 43 विद्यार्थी व 29 विद्यार्थिनी तीन संघ व्यवस्थापक दोन पुरुष शिबीर समन्वयक व्यवस्थापक व एक महिला शिबिर व्यवस्थापक असे आणि दोन शिपाई असे एकूण 80 व्यक्ती सहभागी होते.

धन्यवाद !

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
सी. गो. पाटील महाविद्यालय
साक्री जि. धुळे (४२४३०४)

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts Science & Commerce College
Sakri, Dist. Dhule










'राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर'
सुदृढ युवक श्रेष्ठ भारत


सुदृढ युवक श्रेष्ठ भारत


'राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर'






राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर




'राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर'





NSS




'राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर'





























विशेष श्रमसंस्कार शिबीर
सुदृढ युवक श्रेष्ठ भारत















राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर


राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर

पुण्यनगरी
शुक्रवार, ६ मार्च २०२०

# रासेयोचे राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबिर

**साक्री :** उच्च व तंत्रशिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्याविकास मंडळाच्या सी.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोकले, ता. साक्री येथील श्रीक्षेत्र नागाई येथे राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर नुकतेच झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते तर उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. संदीप सूर्यवंशी, डॉ. विश्वनाथ दरेकर, डॉ. एस. सी.सोनवणे, शिबिर समन्वयक प्रा.विश्वास भामरे, शिबिर सहसमन्वयक डॉ.डी.एस.चव्हाण, शिबिर महिला समन्वयक डॉ.ज्योती वाकोडे उपस्थित होते. शिबिरात प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे, डॉ.अनंत पाटील, हर्षाली गायकवाड, राजरत्न गव्हांदे, निहान शेख, डॉ. साईनाथ उमाटे यांनी मनोगत व्यक्त केले. अहवाल शिबिर समन्वयक प्रा. विश्वास भामरे यांनी मांडला. सूत्रसंचालन ज्योती वाकोडे यांनी तर आभार डॉ.डी. एस. चव्हाण यांनी मानले.



देशदूत
गुरुवार, दि.२७ फेब्रुवारी २०२०

# सुदृढ व सक्षम युवक श्रेष्ठ भारतनिर्मितीचे कार्य करु शकतो!

## डॉ. संजय सोनवणे यांचे प्रतिपादन

■ साक्री । दि.२६ । प्रतिनिधी

सुदृढ व सक्षम युवक श्रेष्ठ भारत निर्मितीचे कार्य करु शकतो. राष्ट्रीय सेवा योजनेत दिल्या जाणाऱ्या मूल्याधारित शिक्षणातून असा सुदृढ युवक निर्मितीचे कार्य केले जाते असे प्रतिपादन डॉ.संजय सोनवणे यांनी केले.

विद्या विकास मंडळाचे सि. गो. पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे श्रीक्षेत्र नागाई कोकले येथे राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात सुदृढ युवक श्रेष्ठ भारत या विषयावर ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंकज कुमार नन्नवरे उपस्थित होते. प्रसंगी प्रा.एल. जी.सोनवणे, डॉ. सचिन नांद्रे, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. संदीप सूर्यवंशी, डॉ. विश्वनाथ दरेकर उपस्थित होते.

पुढे डॉ.संजय सोनवणे म्हणाले की, सक्षम युवक निर्माण करणे हा मुख्य उद्देश या शिबिराचा आहे. शारीरिक सुदृढते सोबत वर्तनातील व विचारातील सक्षमीकरण श्रेष्ठ भारतासाठी अपरिहार्य गोष्ट आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण सुदृढ व्हावे. असे त्यांनी सांगितले.

डॉ. पंकजकुमार नन्नवरे म्हणाले की, समाजासमोरील अनेक विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आणि समस्यांना सक्षमपणे तोंड देणारा युवक घडविण्यासाठी अशा शिबिराचे महत्त्व अधिक आहे. विद्यार्थ्यांनी या शिबिरातून शिकलेल्या मूल्यांचा अवलंब समाजात करावा म्हणजे श्रेष्ठ भारत निर्मितीच्या प्रक्रियेत विद्यार्थी हा मैलाचा दगड ठरु शकेल. असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी सांगितले की, एनएसएस मधून घडलेला तरुण देशाभिमान बाळगणारा असतो. पर्यायाने कुटुंबाचा व देशाचा विकास साध्य होऊ शकतो. सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात महाराष्ट्रातील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,गोंडवाना विद्यापीठ गोंडवाना,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या विद्यापीठातून एकूण ७३ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे संचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.ज्योती वाकोडे यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. विश्वास भामरे यांनी केले.



आपला महाराष्ट्र
बुधवार ४ मार्च २०२०

# विजयाचा उन्माद व पराभवाचे हलाहल पचविण्याचे संस्कार रासेयो शिबीरात होतात : डॉ.अनंत पाटील

साक्री, (प्रतिनिधी):- विजयाचा उन्माद आणि पराभवाचे हलाहल पचविण्याची क्षमता व्यक्तींमध्ये निर्माण करते ते कुटुंब आणि अशा कुटुंबा साठी लागणारे उचित संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबिरा'तून केले गेले असे प्रतिपादन सि गो पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील यांनी केले.

ते महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष मुंबई,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे सि गो पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र नागाई कोकले तालुका साक्री येथे आयोजित राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ साईनाथ उमाटे, प्रा संदीप सूर्यवंशी डॉ विश्वनाथ दरेकर डॉ एस सी सोनवणे शिबिर समन्वयक प्रा विश्वास भामरे, शिबीर सहसमन्वयक डॉ डी एस चव्हाण, शिबीर महिला समन्वयक डॉ ज्योती वाकोडे उपस्थित होते. डॉ अनंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की,



तरुणांनी अशा शिबिरांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून आपले विचार व व्यक्तिमत्त्व विकसित करावे व त्याचा उपयोग आपल्या कुटुंबाला व पर्यायाने समाजाला करून द्यावा. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी सांगितले की सहभागी विद्यार्थ्यांनी शिबिरातून शिकलेल्या मूल्यांना अधिकाधिक सक्रियपणे आपल्या व्यक्तिगत जीवनात समरूप करून घ्यावे. सात दिवसात झालेल्या ज्ञानप्रणीत व मूल्याचे चित्रण निबंध स्वरूपात करून त्याचे पुस्त पठण देखील करावे जेणेकरून घेतलेल्या ज्ञानाची अधिक उजळणी करता येईल. समारोप समारंभात हर्षाली गायकवाड, राजरत्न गव्हांदे निहान शेख व डॉ साईनाथ उमाटे यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिराच्या सात दिवसाचा अहवाल शिबिर समन्वयक प्रा. विश्वास भामरे यांनी मांडला. कार्यक्रमाचे संचालन ज्योती वाकोडे यांनी तर आभार डॉ डी एस चव्हाण यांनी मानले. प्रसंगी कार्यक्रमाला शिबिरार्थी संघव्यवस्थापक प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.